# बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ माहे सप्टेंबर २०१८

## १) गुन्हे प्रकटीकरण शाखा, कक्ष–११, गु.अ.वि; मुंबई

| | | |
|---|---|---|
| १ | **गु.र.क्र व कलम** | MHB कॉलनी पोलीस ठाणे गुरक्र.३०९/१८ कलम ३६३,३७६,३९२,४२० भादवि. |
| २ | **गुन्हा घडला दिनांक** | दिनांक २१/०९/२०१८ र.ोजी १६.०० वा. १७.३० वा. चे दरम्यान |
| ३ | **गुन्हयाचे ठिकाण** | बसस्टॉप क्र.२०४, दहीसर–प स्टेशन ते पश्चिम द्रुतगती महामार्ग, भाईंदर खाडी ब्रीजच्या पुढे, टेकडीजवळ. |
| ४ | **फिर्यादी** | श्रीमती पुष्पाबेन मनसुखलाल काहिया वय ६५ वर्षे |
| ५ | **बळीत** | ६५ वर्षीय फिर्यादी स्वत: |
| ६ | **गुन्हयातील चोरीस गेलेली मालमत्ता** | १) १० ग्रॅम वजनाचे सोन्याची कर्णफुले कि.अं २०,०००/–<br>२) रोख रक्कम रुपये १५,०००/–<br>एकुण किं.रू. ३५,०००/– ची मालमत्ता |
| ७ | **हस्तगत मालमत्ता** | रोख रू. १५,०००/– |
| ८ | **आरोपी अटक** | जिग्नेश जितेंद्र राजानी वय ३१ वर्षे<br>**अटक दिनांक २९/०९/२०१८ रोजी** |

एम.एच.बी. पोलीस ठाणे गुरक्र.३०९/२०१८ कलम ३६३,३७६,३९२,४२० भादवि. या गुन्हयात दिनांक २१/०९/२०१८ रोजी १६.०० वा. १७.३० वा. चे दरम्यान यातील फिर्यादी या दहिसर (प), मुंबई येथील एका बसस्टॉप वर बसची वाट पहात थांबलेल्या असताना एका अनोळखी ऑटो रिक्षा चालकाने त्यांच्याजवळ येवून तो तिच्या विवाहीत मुलाचा मित्र असल्याचे भासवले. त्यानंतर अनोळखी ऑटो रिक्षा चालकाने सदर महिलेस तिच्या मुलाचे एका मुस्लीम महिलेसोबत प्रेमसंबंध असल्याचे सांगुन तो सदर महिलेसह एका हॉटेलमध्ये बसल्याचे खोटे सांगीतले व त्या हॉटेलमध्ये घेवुन जाण्याचे आमीष दाखविले. सदर धक्कादायक माहितीमुळे फिर्यादी महिला ही अनोळखी ऑटो रिक्षा चालकाच्या सांगण्यानुसार त्याच्या रिक्षामध्ये बसुन निघाली. सदर अनोळखी ऑटो रिक्षा चालकाने जेष्ठ नागरीक फिर्यादी महिलेस वेगवेगळया रस्त्याने फिरवुन घोडबंदरमार्गे व भाईंदर खाडी ब्रीज पार करून गुजरातकडे जाणाऱ्या रस्त्याने नेले. तेथुन पुढे एका निर्जनस्थळी ऑटो रिक्षा थांबवुन ज्येष्ठ नागरीक महिलेस मारहाण केली व तिच्याकडील सोन्याचे दागीने, रोख रक्कम जबरीने चोरी करून तिला एकाकी सोडुन निघून गेला. तद्नंतर सदर महिलेने कसेबसे थोडया अंतरावरील रहदारीच्या रस्त्यावर येवुन तेथील रस्त्यावर ये–जा करणाऱ्या नागरीकांच्या मदतीने दहिसर येथील आपल्या घरी आल्या. तद्नंतर फिर्यादी महिलेने एम.एच.बी. पोलीस ठाणे येथे दिलेल्या तक्रारीवरून गुरक्र. ३०९/२०१८, कलम ३९२,४२० भादंवि अन्वये अनोळखी रिक्षा चालकाविरूध्द गुन्हा नोंद केला.

गुन्हे प्रकटीकरण शाखा, कक्ष–११, गु.अ.वि; मुंबई च्या पथकाने नमुद गुन्हयाची माहिती मिळताच गुन्हयाचा तपास सुरू केला. सदर पथकाने फिर्यादी यांचेकडून संपुर्ण घटनाक्रम समजुन घेतला. सदर गुन्हयाचे गांभीर्य ओळखुन वरिष्ठांकडुन गुन्हयातील अज्ञात आरोपीचा शोध घेवुन गुन्हा उघडकीस आणण्याबाबत प्राप्त सुचनांच्या अनुषंगाने गुन्हे शाखा कक्ष–११ चे प्रभारी पोलीस निरीक्षक यांनी गुन्हयाची त्वरीत उकल करण्यासाठी वेगवेगळे पथक तयार केली व सर्व पथकाला काम वाटुन दिली. गुन्हयातील फिर्यादी महिलेस झालेल्या मारहाणीमुळे तिला डॉ.बाबासाहेब आंबेडकर रूग्णालय या ठिकाणी आंतररूग्ण म्हणुन दाखल करण्यात आले होते. बळीत महिलेकडुन ऑटोरिक्षाविषयी व चालकाविषयी कोणतीच माहिती प्राप्त झाली नव्हती किंबहुना अचानक घडलेल्या घटनेमुळे ज्येष्ठ महिला घाबरल्याने त्या घटनेबाबत सविस्तर माहिती सांगत नव्हत्या.

सदर पथकाने नमुद महिला औषधोपचाराकरीता दाखल असलेल्या शताब्दी रूग्णालय, कांदिवली, मुंबई येथे वेळोवेळी सतत भेट दिली. फिर्यादी महिलेस विश्वासात घेवून त्यांचेकडे सातत्यपुर्ण व फिर्यादींच्या कलेनेच चौकशी करता, त्यांनी घटनेच्या दिवशी परिधान केलेल्या साडीचा रंग हा पिवळा होता एवढीच माहिती दिली. सदर घटनेचा बळीत फिर्यादी ज्येष्ठ महिलेस अत्यंत त्रास झाल्याचे दिसुन आल्याने सदर पथकाने बळीत महिलेने दिलेली त्रोटक माहिती हीच एकमेव दुवा असल्याचे विचारात घेवून सदर पथकाने नमुद गुन्हयाचे तपासास सुरूवात केली.

नमुद महिलेकडे समक्ष केलेल्या तपासादरम्यान आरोपीने नमुद महिलेस लाथा व बुक्क्याने बेदम मारहाण करून तिच्या जवळील १) १० ग्रॅम वजनाचे सोन्याची कर्णफुले कि.अं २०,०००/— २) रोख रक्कम रुपये १५,०००/— एकुण किं.रू. ३५,०००/— अशी मालमत्ता जबरीने चोरल्याचे सांगीतले. तसेच तीच्या गालावर, मानेवर चावा घेतल्याच्या खुणा तीच्या अंगावर स्पष्ट दिसत होत्या. सदर परिस्थीतीवरून नमुद महिलेवर आरोपीने लैंगिक अत्याचार केल्याचीही दाट शंका बळावली होती. त्याअनुषंगाने सदर पथकाने गुन्हयाचा तपास सुरू केला.

सदर पथकाने उपरोक्तपणे मिळालेल्या एकमेव दुव्याच्या आधारे घटनाक्रमानुसार आरोपीने फिर्यादीस फिरवलेल्या मार्गावरील सर्व सीसीटीव्ही फुटेज प्राप्त करून त्याची सातत्याने व काळजीपुर्वक तपासणी केली. प्राप्त फुटेजचे अत्यंत बारकाईने निरीक्षण करून त्यामध्ये पिवळया रंगाच्या साडीमध्ये ऑटोरिक्षातुन प्रवास करणाऱ्या सर्व ऑटोरिक्षांचा तपशील प्राप्त करून गुन्हयाच्या तपासाला सुरूवात केली. तपासी पथकाला गुन्हयाचे तपासादरम्यान एका ऑटोरिक्षा चालकाबद्दल संशय बळावला असता, सदर ऑटोरिक्षाचा सी.सी.टी.व्ही. फुटेजच्या आधारे नोंदणी क्रमांक एम.एच.०२—सीटी—५०३ हा प्राप्त केला. त्याआधारे नमुद ऑटोरिक्षा मालकाची माहिती काढली असता, ऑटो रिक्षाचा मालक पुणे येथे रहावयास असल्याची माहिती मिळाली. सदर पथकाने नमुद ऑटोरिक्षावर घेण्यात आलेल्या कर्जाची माहिती प्राप्त करून कर्ज देणाऱ्या बॅकेकडूनही माहिती घेता, नमुद ऑटो रिक्षाचे कर्जाचे हप्ते थकले असल्याने बॅक सदर रिक्षामालकाचा व रिक्षाचा शोध घेत असल्याची माहिती बॅकेकडुन प्राप्त झाली. तसेच रिक्षा मालक व आरोपीबाबत बॅकेकडूनही उपयुक्त माहिती मिळून आली नाही.

त्यानंतर सदर पथकाने खास व विश्वासू बातमीदार यांना नमुद रिक्षाची माहिती देवून पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी वैयक्तीररित्या गोरेगांव, मालाड, कांदीवली, दहिसर इत्यादी परिसरात दिवस—रात्रौ सदर रिक्षाची माहिती काढली असता नमुद क्रमांकाची रिक्षा ही पठाणवाडी रिक्षा स्टॅण्ड, राणीसती मार्ग, मालाड पुर्व, मुंबई येथे भाडे घेण्याकरीता व सोडण्याकरीता येत असते अशी खात्रीलायक माहिती प्राप्त झाली. त्यावरून सदर पथकाने प्राप्त पत्त्यावर जावून सापळा लावला असता दिनांक २९/०९/२०१८ रोजी नमुद रिक्षा व चालक असे पठाणवाडी रिक्षा स्टॅण्डवर आले असता, सदर नामे जिग्नेश जितेंद्र राजानी वय ३१ वर्षे यास पथकाने शिताफीने ताब्यात घेवून चौकशीकामी कक्ष कार्यालयात आणले व त्याच्याकडे नमुद गुन्हयाच्या अनषंगाने कसुन सखोल तपास केला असता, त्याने नमुद गुन्हा केल्याची स्पष्ट कबुली दिली. तसेच नमुद गुन्हयाचे तपासामध्ये सदर ऑटोरिक्षा चालकाने ज्येष्ठ नागरीक महिलेस मारहाण करून दागीने व रोख रक्कमेची जबरी चोरी केली व त्याव्यतिरिक्त तिच्या इच्छेविरूध्द अंगावरील साडी काढुन तीच्यावर जबरी संभोग केला व सदर महिलेस जखमी अवस्थेत सोडून तेथून निघून गेला अशीही माहिती दिली. यावरून आरोपी नामे जिग्नेश जितेंद्र राजानी वय ३१ वर्षे यास नमुद गुन्हयात दिनांक २९/०९/२०१८ रोजी रितसर अटक केले. सदर आरोपीस गुन्हयाचे पुढील कायदेशीर कारवाई करण्याकरीता एम.एच.बी.पो.ठाणे, मुंबई यांचे ताब्यात दिले असुन तपासा दरम्यान निष्पन्न झालेल्या गुन्हेगारी कृत्याबाबत नमुद गुन्हयामध्ये कलम ३७६, ३६३ भा.दं.वि. वाढविण्यात आले..

गुन्हे प्रकटीकरण शाखा, कक्ष—११, मुंबई चे पथकाने मानवी कौशल्य व सिसिटिव्ही फुटेजच्या आधारे अंत्यत संयमाने व केवळ फिर्यादी महिलेच्या साडीचा रंग या त्रोटक दुव्याच्या आधारे ६५ वर्षीय ज्येष्ठ नागरीक महिलेस जबरी चोरी करण्याच्या इराद्याने अज्ञातस्थळी नेवुन व मारहाण करून तीच्यावर जबरी संभोग करणाऱ्या ऑटो रिक्षा चालकाचा अत्यंत कसोशीने शोध घेवुन त्यास नमुद गुन्हयात अटक करून सदरचा गुन्हा उघडकीस आणला आहे.

सदरच्या गंभीर व संवेदनशील गुन्हयाची कौशल्याने उकल केल्याने **मा. पोलीस आयुक्तांनी त्यांना सप्टेंबर —२०१८ चे बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ** अर्थात उत्कृष्ट गुन्हे शोधाचे पारितोषिकाने सन्मानित केले आहे.

**गुन्हे प्रकटीकरण शाखा, कक्ष—११, मुंबई तपास पथकातील पोलीस अधिकारी/अंमलदार**

| अ.क्र. | पोलीस अधिकारी/अंमलदार नांव | अ.क्र. | पोलीस अधिकारी/अंमलदार नांव |
|---|---|---|---|
| ०१ | पोलीस निरीक्षक चिमाजी जगन्नाथ आढाव | ०५ | पोहक्र.२४६८२/अविनाश कृष्णाजी शिंदे |
| ०२ | पोलीस निरीक्षक रईस मोहम्मद नजीर शेख | ०६ | पो.ना.क्र.३४१६९/महादेव दत्तात्रय नावगे |
| ०३ | सहा—पोलीस निरीक्षक शरद आसाराम झिने | ०७ | म.पो.ना.क्र.००१२/प्राची निलेश मुळीक |
| ०४ | सपोफौ.२३००५/नरेंद्र रामचंद्र मयेकर | ०८ | पो.शि.क्र.०३६०४/निलेश अर्जुन शिंदे |

--- ००० ---

२) **BKC पोलीस ठाणे, मुंबई –**

| | | |
|---|---|---|
| १ | **गु.र.क्र व कलम** | BKC पोलीस ठाणे गुरक्र.२४३/२०१८ कलम ३७६,३९४,४५२ भादवि सह ४,८,१२ पोक्सो कायदा |
| २ | **गुन्हा घडला दिनांक** | दिनांक १०/०९/२०१८ रोजीचे ११.४५ वा ते १२.३० वा.चे दरम्यान |
| ३ | **गुन्हयाचे ठिकाण** | रूम नं. १६९, चाळ न. ११, शिव मंदीराच्या बाजूला, भारतनगर, बांद्रा पुर्व, मुंबई |
| ४ | **फिर्यादी** | फिर्यादी श्रीमती मुमताज अजिज हुसैन सैय्यद वय २८ वर्षे |
| ५ | **बळीत** | फिर्यादी यांची ११ वर्षीय अल्पवयीन मुलगी |
| ६ | **गुन्हयातील चोरीस गेलेली मालमत्ता** | १) रोख रक्कम १५,०००/–,<br>२) एक सोन्याची चैन पेन्डटसह, सोन्याची कर्नफुलाची जोडी, सोन्याची एक अंगठी<br>**एकूण किंमत रू. ४५,०००/–ची मालमत्ता** |
| ७ | **हस्तगत मालमत्ता** | १) गुन्हयात वापरलेला चाकू व परिधान केलेले कपडे,<br>२) एक सोन्याची चैन व पेन्डट, सोन्याची कर्नफुलाची जोडी, सोन्याची एक अंगठी,<br>३) रोख रक्कम ७०००/–<br>**एकूण किंमत रू.३८,०००/–ची मालमत्ता** |
| ८ | **आरोपी अटक** | शेरअली उर्फ बाबा यासीन शेख वय २२ वर्षे<br>**अटक दिनांक १४/०९/२०१७ रोजी १८.१० वा.** |

BKC पोलीस ठाणे गुरक्र.२४३/२०१८ कलम ३७६,३९४,४५२ भादवि सह ४,८,१२ पोक्सो कायदा या गुन्हयात दिनांक १०/०९/२०१८ रोजीचे ११.४५ वा ते १२.३० वा.चे दरम्यान रूम नं. १६९, चाळ न. ११, शिव मंदीराच्या बाजूला, भारतनगर, बांद्रा पुर्व, मुंबई याठिकाणी एक अनोळखी इसम (नेसणीस लाल रंगाचा शर्ट, मध्यम बांधा, सावळा वर्ण वय अंदाजे २० ते ३० वर्षे) याने फिर्यादी यांची ११ वर्षीय अल्पवयीन मुलगी घरात एकटी असताना घरात घुसुन तिचे हात–पाय बांधले व तोंडात कपडा कोंबून तिच्यावर लैंगिक अत्याचार करून तिला चाकूचा धाक दाखवून जीवे ठार मारण्याची धमकी देवून घरातील सोन्याचे वेगवेगळे दागीने व रोख रककम अशी एकूण किंमत रू.३८,०००/–ची मालमत्ता चोरून नेली म्हणुन फिर्यादी यांनी दिनांक १०/०९/२०१८ रोजी तक्रार दिल्यावरून नमुद प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

BKC पोलीस ठाणे चे पथकाने नमुद गुन्हयाची माहिती मिळताच तपास सुरू केला. नमुद गुन्हयाचे तपासाचे अनुषंगाने फिर्यादी यांची प्रत्यक्ष भेट घेवून गुन्हयाचा पुर्ण घटनाक्रम समजुन घेतला. सदरवेळी फिर्यादी यांनी तपासी पथकाला सांगीतले की, फिर्यादी या दिनांक १०/०९/२०१८ रोजी ११.३० वाजता त्यांचा लहान मुलगा समी यांसश्स्कुल व्हॅन मध्ये बसवून नियमितपणे शाळेत पाठवून दिले. साधारण ११.४५ वाजता बळीत ११ वर्षीय अल्पवयीन मुलीस घरी एकटीच ठेवुन मार्केटमध्ये खरेदी साठी गेल्या. साधारणपणे १२.२० वाजता त्यांना फोन आला कि, त्यांच्या मुलीचे हात बांधून त्यांच्या घरी चोरी झाली आहे. फिर्यादी हया तात्काळ घरी आले असता, त्यांची मुलगी खूप घाबरलेली दिसुन आली. त्यामुळे फिर्यादींनी तिचेकडे विचारणा करता तिने सांगीतले की, फिर्यादी खरेदीसाठी बाहेर गेल्यानंतर १० ते १५ मिनीटांनी एक साधारण २५–३० वर्षाचा एक इसम आला व त्याने ‘‘ पप्पा मम्मी किधर है ’’ असे विचारले. ते बाहेर असल्याचे समजताच त्याने घरात प्रवेश करून फिर्यादींच्या नमुद मुलीचे तोंडात तीचाच टि–शर्ट कोंबून तिचेवर लैंगिक अत्याचार केला. त्यानंतर बळीत मुलीस चाकूचा धाक दाखवून तिचेकडून पैसे व दागिने याची माहिती घेवून कपाटीतील रोख रक्कम व सोने एकुण किं.रू. ५१,०००/–ची मालमत्ता काढून घेतली व बळीत मुलीचे पुन्हा हात पाय बांधून बाहेरून कडी लावून पळून गेला.

गुन्हा उघडकीस आणण्यासाठी वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली वेगवेगळी पोलीस पथके तयार केली. गुन्हा घडल्यानंतर तात्काळ पोलीस पथकांने घटनास्थळी भेट देवून परिस्थितीची बारकाईने तपासणी केली. घटनास्थळ हे झोपडपट्टीतील पहिल्या माळयावरील खोली असल्याने व प्रत्यक्षदर्शी साक्षीदार नसल्याचे आढळुन आले. तसेच घटनास्थळ हे झोपडपट्टीत असल्याने सदर ठिकाणी कोणतेही सी.सी.टी.व्ही. कॅमेरे आढळुन आले नाहीत. तसेच घटनास्थळ व आजुबाजुच्या रस्त्यावरही कमी रहदारी असल्याने व तुलनेने बऱ्याच गल्ल्या असल्याने तसेच

गल्लीमध्ये जाणाऱ्या येणाऱ्या इसमांची संख्या प्रचंड असल्याने सी.सी.टी.व्ही. कॅमेऱ्यामधील संशयित ओळखणे कठीण झाले होते.

सदर पथकाने घटनास्थळ व आजुबाजुच्या परीसरात स्थानिक झोपडपट्टी धारकांकडे नमुद गुन्हयाचे तपासाचे अनुषंगाने तपास सुरू केला. सदर गुन्हयातील आरोपीत हा त्याच झोपडपट्टीतील नशेखोर इसम असल्याची शक्यता गृहित धरून सदर पथकाने गुन्हा उघडकीस आणण्यासाठी सीडीआर, डम डाटा असा कोणताही तांत्रिक दुवा उपलब्ध नसतांना, सदर पथकाने अहोरात्र मेहनत करून विभागातील अंमली पदार्थाचे सेवन करणारे, रस्त्यांवर आणि रिक्षांमध्ये झोपणाऱ्या इसमांकडे सतत कसोशीने व कौशल्यपुर्ण तपास केला. नमुद गुन्हयाचे तपासादरम्यान सदर पथकास गुप्त बातमीदाराकडुन खात्रीलायक माहीती मिळाली की, रिक्षांमध्ये झोपणारा इसम नामे शेरअली उर्फ बाबा यासीन शेख वय २२ वर्षे याच्या गळयात सोन्याची चेन दिसत आहे. फिर्यादीच्या घरातुन चेन चोरीला गेलेली होती यावरून सदर पथकाने शेरअली उर्फ बाबा यासीन शेख याचा तात्काळ कसोशीने शोध घेवून त्यास ताब्यात घेतले. सदर पथकाने ताब्यातील आरोपी नामे शेरअली उर्फ बाबा यासीन शेख वय २२ वर्षे याचेकडे नमुद गुन्हयाचे तपासाचे अनुषंगाने सखोल कौशल्यपुर्ण तपास करता, त्याने नमुद गुन्हया केल्याची स्पष्ट कबुली दिली. त्यावरून त्यास दिनांक १४/०९/२०१७ रोजी १८.१० वा. नमुद गुन्हयात रितसर अटक केली.

सदर पथकाने अटक आरोपीकडे त्याचे अटकेदरम्यान गुनहयातील मालमत्ता हस्तगत करण्याचे दृष्टिने कसुन चौकशी करता, त्याचे निवदनान्वये गुन्हयात चोरीस गेलेले सर्व सोन्याचे दागीने, रोख रक्कम रू.७,०००/– तसेच गुन्हयातील हत्यार सविस्तर पंचनाम्यान्वये हस्तगत केले. तसेच अटक आरोपीताकडे सदर पथकाने विचारणा करता, गुन्हयातील चोरलेली उर्वरीत रक्कम नशापानामध्ये खर्च केल्याचे सांगीतले.

BKC पोलीस ठाणेचे पथकाने केवळ मानवी कौशल्याचे आधारे फिर्यादी यांची ११ वर्षीय अल्पवयीन मुलगी घरात एकटी असताना घरात घुसुन तिचे हात–पाय बांधुन व तोंडात कपडा कोंबून तिच्यावर लैंगिक अत्याचार करून तिला चाकूचा धाक दाखवून जीवे ठार मारण्याची धमकी देवून घरातील सोन्याचे वेगवेगळे दागीने व रोख रक्कम चोरी करणाऱ्या आरोपीस फक्त ५ तासाचे आत आत अटक करून नमुद गंभीर गुन्हा उघडकिस आणला आहे.

सदरच्या गंभीर व संवेदनशील गुन्हयाची कौशल्याने उकल केल्याने **मा. पोलीस आयुक्तांनी त्यांना सप्टेंबर –२०१८ चे बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ** अर्थात उत्कृष्ट गुन्हे शोधाचे पारितोषिकाने सन्मानित केले आहे.

## BKC पोलीस ठाणे, मुंबई तपास पथकातील पोलीस अधिकारी/अंमलदार

| अ.क्र. | अधिकारी/अंमलदार यांची नावे | अ.क्र. | अधिकारी/अंमलदार यांची नावे |
|---|---|---|---|
| ०१ | वरिष्ठ पोलीस निरीक्षक कल्पना यशवंत गाडेकर | ०८ | पो.ना.क्र.३२५७७/उत्तम श्रीपती पाटील |
| ०२ | पोलीस निरीक्षक सागर जगन्नाथ शिवलकर | ०९ | पो.ना.क्र.४६२३/दिपक गंगाधर ठाकरे |
| ०३ | पोलीस निरीक्षक प्रदीप राजाराम खानविलकर | १० | पो.ना.क्र.०१३१२/नितीन उत्तम घोरपडे |
| ०४ | सहा पोलीस निरीक्षक सतिश रविंद्र बोराटे, | ११ | पो.शि.क्र.०६९७८/गणेश तुकाराम ठोंबरे |
| ०५ | पोलीस उप निरीक्षक गणेश शिवाजी तोडकर | १२ | पो.शि.क्र.०७०८०७/योगेश रामनाथ काकड |
| ०६ | मपोउनि. हसीना उस्मानगणी शिकालगार | १३ | पो.शि.क्र.०९२६७८/रवि रामचंद्र गायकवाड खेरवाडी पो. ठाणे. |
| ०७ | पो.ह.क्र.९३४/प्रदीप सदानंद नाईक | –– | –– |

—— ००० ——